नि.फौ.ख.नं. २०८/२०१६

नि.६९

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची जबानी

मी शपथेवर साक्ष देतो की,

माझे नांव – लहानुबाई भाउसाहेब जगताप

वय – ५७ वर्षे, व्यवसाय – शेती ,

रा. मु.पो. सालेवडगांव , ता.आष्टी, जि.बीड

---

**सर तपासणी सरकारतर्फे श्री.सी ए जावळे वकील यांचे मार्फत–**

१. मी फिया्रदि ला ओळखते. तो माझा मुलगा आहे. आरोपी क्रमांक १ ते ५ यांना ओळखते ते माझ्या शेजारी रहायाला आहेत. घटना ही साधारण आठ ते नउ वर्षापुर्वी घडली. सदरची घटना संध्याकाळी ५.३० ते ६ च्या दरम्यान घटना घडली. त्यादिवशी माझ्े मालक आणि मुलगा रानात आले होते. त्यानंतर मी मागुन दुपारी रानात आले. माझ्या मालकांनी व मुलानी मला सांगितले की विठठल डोके आणि नारायण डोके यांनी रस्तयावर काटया टाकलेल्या आहेत. त्यानंतर साडेपाच वाजण्याच्या दरम्यान गाडीवर माझे मालक व मुलगा घरी जाण्यास निघाले व मी त्यांच्या पाठीमागे पाईपाई निघाले. विठठल डोके आणि अर्चना डोके हे काठया घेवुन रत्यावर उभे होते. मग आम्ही घाबुरुन म्हतारदेव डोके यांच्या वस्तीवर गेलो. मी माझ्या मालकाला म्हतारदेव डोके यांच्या घरामध्ये ठेवले. मी आणि माझा मुलगा वस्ती समोर उभे राहिलो.त्यानंतर आसाराम डोके तलवार घेवुन आला. त्याच्या पाठीमागे नारायण विठठल डोके हा कु–हाड घेवुन आला. नंतर विठठल् डोके हा काठी घेवुन आला. मीना सुंभे आणि अर्चना सुंभे हे त्यांच्या पाठीमागुन आले. त्यानंतर त्या तिथे आल्या व त्यांनी लाथा बुकयाने आम्हाला मारहाण केली. आसाराम डोके यांनी बापु जगताप म्हणजेच माझ्या मुलाच्या हातावर तलवार मारली. शिवाजी डोके यांनी मला कु–हाडीने पाठीवर मारले. लता अजुर्न डोके ही आमचे भांडणे सोडविण्यासाठी आले असता तीला ही मारहाण केली. मीना सुंभे हीने लता डोके हीच्या गळयातील हार तोडला. त्यानंतर पुढे दोन दिवसांनी पोलीस गावी आले आणि आमची पोलीसांनी जबाब नोंदविले. ज्या तलवार आणि कू–हाडीने माझ्या मुलाला व मला मारहाण झाली ती मी दाखविल्यास ओळखु शकते. साक्षीदाराने **एम ओ १ – कु–हाड व एम ओ २ – तलवार** यास न्यायालसमोर ओळखले. त्याच तलवारीने व कु–हाडीने तीला व तीच्या मुलाला मारहाण केल्याचे सांगितले. आज रोजी आरोपी न्यायालयासमक्ष हजर आहेत. आरोपी क्र १ ते ३ व ५ यास साक्षीदाराने न्यायालयासमक्ष ओळखले. आरोपी क्र ४चा हजेरी माफीचा अर्ज निशाणी ६८ वर मंजूर करण्यात आला.

**सरतपास पुर्ण.**

**उलट तपास अरोपी तर्फे अॅड. एस बी म्हस्के यांचे मार्फत शपथेवर सुरु**

२. मला दोन मुले आहेत. एक बापु आणि दुसरा संपत असे त्यांचे नावे आहेत. मी सर्वे नंबर १६८ मध्ये गेले होते. सर्वे नंबर १६८ मध्ये आमचे क्षेत्र हे तीन एकर अकरा गुंठे आहे. सदरची जमीन ही आम्ही गणेश विठठल दहातोंडे यांचे कडुन विकत घेतलेली आहे. सदरची जमीन ही विकत घेवुन ही साधारण पंचवीस वर्ष झाले आहे. हे म्हणने खरे आहे की , म्हतारदेव डोके यांनी सदर क्षेत्रामध्ये उत्तरेकडुन जमीन खरेदी केलेली आहे. हे म्हणने खरे आहे की , सालेवडगांव ते कडा हा रस्ता आमचया व आरोपीच्या जमीनीच्या मधुन जातो. हे म्हणने खरे आहे की ,सालेवडगांव ते कडा या रस्तयाच्या उत्तरेकडुन म्हतारदेव डोके यांची दोन्ही बाजुनी जमीन आहे.

३. हे म्हणने खरे नाही की म्हतारदेव डोके यांची वाटणी संपल्यानंतर आम्हाला आमच्या शेतात जाता येते. हे म्हणने खरे नाही की विठठल् डोके यांच्या वस्तीकडे आम्हाला जाण्याची गरज नाही. हे म्हणने खरे आहे की , विठठल् डोके सुध्दा सदरच्या गाडीरस्त्यावरुन त्यांच्या शेतात जातात. हे म्हणने खरे आहे की सर्वे नबर १६८ मध्ये विहीर नाही. हे म्हणने खरे नाही की विठठल् डोके यांनी माझा मुलगा संपत , बापु व मालक भाउसाहेब यांचे विरुध्द सर्वे नंबर २१२ मध्ये नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३५८/२०१४ हा दाखल केला आहे.

४. हे म्हणने खरे नाही की माझे दोन्ही मुले व माझे मालक यांनी आरोपीचा हौद फोडला, कांदयाची साल आणि फळ झाडे तोडली. हे म्हणने खरे नाही की आमची तीन एकर अकरा गुंठे जमीन कमी भरत होती. हे म्हणने खरे आहे की , आम्ही जमीन खरेदी घेतल्यानंतर सरकारी मोजणीने जमीन मोजुन घेतली होती. हे म्हणने खरे आहे की , सिताराम रंगनाथ दहातोंडे ची मुलगी माझी सुन आहे. शेतामध्ये पहीले माझे मालक आणि मुलगा गेले होते त्यानंतर मी दुपारी गेले. मी दुपारी दीड ला शेतात गेले होते. हे म्हणने खरे आहे की , मी दुपारी शेतात जाण्याच्या वेळी आरोपी मला काहीही बोलेले नव्हते.

५.	मी शेतामध्ये चार ते पाच तास होते. हे म्हणने खरे आहे की , मालक आणि मुलगा मोटारसायकलवर गावाकडे निघाले होते. हे म्हणने खरे आहे की , मी पाठीमागुन पायी निघाले होते. म्हतारदेव डोके च्या वस्ती आम्ही तिघे गाडी ढकलत गेले होतो. म्हातारदेव डोके यांच्या वस्तीवर घरातील लोक होते. म्हतारदेव डोके आणि विठ्ठल डोके यांची भावकी आहे की नाही याबाबत मला काही सांगता येत नाही. म्हतारदेव डोके आणि विठ्ठल डोके यांच्या मध्ये ब्रामहणाच्या जमीनी घेण्यामुळे ब–याच  वर्षापासुन वाद आहे की नाही याबाबत मला काही सांगता येणार नाही.

प्रश्न – म्हतारदेव डोके यांच्या घरामध्ये तुमच्या मालकाला तुम्ही आणि तुमचा मुलगा घरामध्ये का बसला नाहीत.

उत्तर – आमच्या मालकाला मधात ढकलले आणि कडी लावुन घेतली.

६.	आसाराम , नारायण व विठ्ठल हे आमच्या कडे कू–हाड , तलवार व काठी घेवुन आले असता आम्ही आरडा ओरडा केली. आम्ही आरडाओरडा केल्यानंतर आजुबाजुचे शेतकरी आमच्या मदतीला आले नाहीत. आसारामने बापु च्या हातावर तलवार मारली व  मला नारायण डोके यांनी पाठीमागुन कु–हाडीने मारले होते हे मी पोलीसांना सागितले होते.  पोलीसांनी हे माझ्या जबाबात का नमुद केले नाही याचे कारण मला सांगता येत नाही.

७.	हे म्हणने खरे आहे की , पोलीसांसी माझा काहीही वाद नाही. लताबाई डोके ही आम्हाला सोडवायला आली होती तेंव्हा तीला जखम झाली होती. हे म्हणने खरे आहे की , मीना सुंभे हीने लताबाइच्या डोक्यातील हार तोडला. लताबाइ हीच्या गळयात असलेल्या हारामध्ये काळे मनी व सोन्याचे मनी किती होते हे मला सांगता येणार नाही. मी स्वतहुन सांगतो की लताबाइचा हार चौदा ते पंधरा ग्रॅम चा होता. भांडणाच्या अगोदर एम ओ १ आणि एम ओ २ मी पाहीलेले नव्हते. भांडण झालयावर एम ओ १ आणि एम ओ २ आमच्या ताब्यात आले नाही. मी  स्वतहुन सांगते की आरोपीने एम ओ १ आणि एम ओ २ गंजीत ठेवले होते.

८. मी सरतपासामध्ये सांगितलेली घटना ही साधारण अर्धा तास चालली. सदरच्या अर्धा तासामध्ये वाटसरु लोक व गावातील लोक कोणीही तिथे आले नाही. हे म्हणने खरे नाही की आठ नउ वर्षापुर्वी घटना घडलेली हे मी खोटै सांगत आहे. हे म्हणने खरे नाही त्यादिवशी माझा मुलगा व माझे मालक शेतात गेलेले नव्हते. हे म्हणने खरे नाही की विठठल डोके , अर्चना डोके हे काठया घेवुन रस्त्यामध्ये उभे होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की मी माझा मुलगा व माझे मालक म्हतारदेव डोके यांच्या वस्तीवर गेले होते हे मी खोटै सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की आसाराम, नारायण व विठठल् काठी , तलवार व कू–हाड घेवुन आले हे मी खोटै सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की मीना व अर्चना यांनी मला शिवीगाळ करुन लाथाबुक्याने मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की , आसारामने बापुच्या हातावर तलवार मारली व नारायण याने माझ्या पाठीवर कू–हाड मारली हे मी खोटै सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की , लताबाई डोके ही आम्हाला सोडवायला आली त्यावेळी मीनाने तिच्या गळयातील हार तोडला हे मी खोटै सांगत आहे.

९. हे म्हणने खरे नाही की , आरोपी क्र १ याने तहसीलदार साहेबाकडे आम्ही गाडी रस्तयावर पवळ घातली म्हणुन तक्रार केली होती. हे म्हणने खरे नाही की , आम्ही आमच्या गावातील राजकीय शिवाजी डोके यांच्या सांगण्यावरुन सदरची केस केली आहे. हे म्हणने खरे नाही की , शिवाजी डोके यांनी आम्हाला पुढे करुन सदरची केस करायला लावली. हे म्हणने खरे नाही की , मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

( एस.व्ही.उतकर )

दि.१७–०२–२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, आष्टी., कोर्ट क्र ३